ISSN 2278-8808
An International Peer Reviewed
SCHOLARLY RESEARCH JOURNAL
FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक योगदान

**डॉ दिगंबर दुर्गाडे**
सहयोगी प्राध्यापक, टिळक शिक्षण महाविद्यालय, पुणे

**सारांश**

*ज्या काळात समाजात स्त्रीला हीन दर्जाची वागणूक मिळत होती, चूल आणि मूल इतकेच तिचे कार्यक्षेत्र होते, तिने शिक्षण घेणे म्हणजे पाप समजले जाई अशा काळात सावित्रीबाईंनी शिक्षण घेवून घराचा उंबरठा ओलांडून सार्वजनिक जीवनात प्रवेश केला. शिक्षीका, मुख्याध्यापिका, व्यवस्थापक लेखिका, कवयित्री, समाजसुधारक अशा विविध भूमिका पार पाडत स्त्री सुध्दा समाजविधायक असे क्रांतिकार्य करू शकते, हे जगाला सिद्ध करून दाखविले. म. फुलेंनी स्थापन केलेल्या शाळा कोणत्याही संकटाला न डगमगता यशस्वीपणे चालविल्या आणि या शाळांमधून केवळ साक्षर होण्यापुरते न देता विचारशक्ती वाढविणारे अन्यायाविरूध्द झगडण्याची ताकद देणारे शिक्षण देण्याचा प्रयत्न केला.*

*मनुष्यत्वासाठी शिक्षण, ज्ञान हीच खरी शक्ती, सक्तीचे शिक्षण देणे ही पालकांचे कर्तव्य, अनुवंश व परिस्थितीचा शिक्षणावर होणारा परिणाम, आनंददायक शिक्षणपध्दती, वेतन म्हणून शिक्षकांना मिळणारा मोबदला असे शिक्षणविषयक सिद्धांत स्वत:च्या अनुभवाच्या आधारे मांडले, जे आजच्या आधुनिक काळात, २१व्या शकताही कालबाहय न ठरता काळसुसंगत ठरतात, यातच सावित्रीबाईंच्या शैक्षणिक योगदानाचे वेगळेपण जाणवते.*

***महत्वाचे मुद्दे** : सावित्रीबाई फुले, शिक्षण*

## प्रस्तावना :

स्त्री शिक्षणाच्या क्षेत्रात अग्रक्रमाने घेतले जाणारे नाव म्हणजे सावित्रीबाई फुले. केवळ महाराष्ट्राच्याच नव्हे तर देशाच्या स्त्री जीवनाला आकार देणारी रचनात्मक शक्ती म्हणजे सावित्रीबाई फुले होय. म. फुल्यांनी मांडलेला स्त्री पुरूष समानतेला विचार, स्त्रिया व दीन

दलितांना असलेली शिक्षणाची गरज व त्यातून उंचावणारा सामाजिक दर्जा सावित्रीबाईंच्या कर्तृत्वातून साकार झाला.

कोणत्याही व्यक्तीचे कार्य हे त्याकाळच्या परिस्थितीवर अवलंबून असते. म्हणून कोणत्याही व्यक्तीच्या कार्याचे मूल्यमापन करताना, विचार समजून घेताना त्या काळची परिस्थिती देखील महत्वाची ठरते. सावित्रीबाईंचे शैक्षणिक विचार, कार्य समजून घेताना त्याकाळची परिस्थिती समजून घेणेही महत्वाचे ठरते.

**तत्कालीन परिस्थिती :**

म. फुले व सावित्रीबाईंच्या कार्यकाळावर पेशवाईचा प्रभाव होतो. पुणे हा तर सनातन्याचा बालेकिल्ला होता. स्त्रियांच्या शिक्षणाला, घराबाहेर पडण्याला सनातन्यांचा कडकडून विरोध होता स्त्रिया शिकल्या तर तो अधर्म असेल, त्या कुमार्गाला लागतील, विधवा होतील, मर्यादा ओलांडतील, स्वच्छंदी, खर्चिक बनतील, स्त्रिया वाचू लागल्या तर अक्षरांच्या अळया बनून घरातील बाप्या माणसांच्या ताटात पडतील. अशा एक ना अनेक समज गैरसमजांच्या काळात म फुल्यांनी सावित्रीबाईंना शिक्षण देण्याचा एक ऐतिहासिक निर्णय घेतला. त्यांना केवळ शिक्षण देवून सुशिक्षीत केले नाही तर त्यांना आपल्या समाजकार्यात, स्त्रियांना शिक्षण देण्याच्या कामात स्वतःच्या बरोबरीने सहभाग करून घेतले आणि देशाच्या इतिहासातील एका ऐतिहासिक अशा क्रांतीकार्याला सुरूवात केली.

**शिक्षणाचा प्रारंभ :**

जोतीबांनी सुरूवातीस सावित्रीबाईंना घरीच शिक्षणाचे धडे दिले. परंतु त्यांना शिक्षिका म्हणून तयार करण्यासाठी मिचेलबाईंच्या नॉर्मल स्कूलमध्ये अध्यापनाचे प्रशिक्षणही पूर्ण करण्यास लावले आणि १८४८ साली पुण्यात पहिली मुलींची शाळा तात्यासाहेब भिडेंच्या वाडयात सुरू केली. त्या काळात मुलींनी शिक्षण घेण्यास समाजाचा प्रखर विरोध होता. अशाही काळात ६ मुलींची नावे शाळेत दाखल झाली होती. अन्नपूर्णा जोशी, सुमती मोकाशी, दुर्गा देशमुख, माधवी थत्ते, सोनू पवार, जनी कर्डिले.

अशा या ६ विद्यार्थीनींसह शाळा चालवत असताना समाजाच्या प्रखर विरोधाला सावित्रीबाईंना तोंड दयावे लागले. समाजातील उच्चवर्णीयांबरोबर स्वत:च्या आप्तस्वकीयांच्या, नातेवाईकांच्या विरोधाला तोंड दयावे लागले. सुरूवातीला त्यांच्या सासऱ्यांवर दबाव आणला. परिणामी त्यांना व जोतीबांना राहते घर सोडावे लागले आणि गंजपेठेतील मित्राच्या घरी आश्रय घ्यावा लागला. तरीही सावित्रीबाई डगमगल्या नाहीत. शाळेत येत जाता लोक त्यांच्या अंगावर शेण, दगडगोटे, चिखल टाकत. अशा लोकांना त्या म्हणत, तुम्ही माझ्या अंगावर टाकलेले शेण, दगडगोटे मला फुलेच वाटतात. हाती घेतलेल्या कामापासून जराही न डगमगता त्यांनी आपले अंगीकृत घेतलेले कार्य सोडले नाही. यामुळेच म. फुले म्हणायचे, ''माझ्या हातून जी काही समाजसेवा झाली,'' शिक्षणाचे कार्य घडले त्यास तूच (सावित्रीबाई) कारणीभूत आहे.''

१८४८ ते १८५२ या काळात म फुले वव सावित्रीबाईंनी पुणे आणि पुण्याच्या परिसरात भिडेवाडा, कसबा पेठ, नाना पेठ, रास्ता पेठ, वेताळ पेठ, आण्णासाहेब चिपळूणकर वाडा, हडपसर, ओतूर, सासवड, नायगाव, शिरवळ, तळेगाव ढमढेरे, शिरूर अशा वेगवेगळया ठिकाणी किमान १९ ते २० शाळा सुरू केल्या आणि त्या सक्षमपणे चालवून दाखविल्या.

**शिक्षक व अभ्यासक्रम :**

अशा या शाळा तर सुरू केल्या पण या शाळांमध्ये अध्यापन करण्यासाठी शिक्षक पाहिजेत. यासाठी त्यांनी स्वत: नॉर्मल स्कूल तयार केले. आपल्या शाळेत मुलांना जागतील अदययावत अशा विविध विषयांचे ज्ञान मिळावे म्हणून बाळशास्त्रीकृत हिंदुस्थानचा इतिहास, मोडीवाचन, व्याकरण, भूगोल, गणित, नकाशावाचन असा अभ्यासक्रम तयार करण्यात आला होता.

**सावित्रीबाईंचे योगदान :**

या सर्व शाळांमध्ये जिथे कमी तिथे सावित्रीबाई या पध्दतीने त्यांनी काम केले. ज्या शाळात शिक्षक कमी तिथे त्या शिक्षिका बनल्या जिथे मुख्याध्यापक नसेल तिथे मुख्याध्यापक म्हणून जबाबदारी पार पाडले तर काही ठिकाणी विश्वस्त म्हणून शाळेचे कामकाज पाहिजे.

**शाळांची प्रगती :**

या शाळांमध्ये दिले जाणारे शिक्षण हे इतक्या उच्च प्रतीचे होते की, दि पूना ऑब्झर्व्हर या त्या काळात प्रसिध्द होणाऱ्या नियतकालिकात म्हटले होते, ''जोतीरावांच्या शाळेतील मुलींची संख्या सरकारी शाळेतील मुलांच्या संख्येपेक्षा १० पटीने जास्त आहे. कारण तेथील शिकविण्याची व्यवस्था सरकारी शाळांपेक्षा अनेकपट श्रेष्ठ आहे. हे असेच चालू राहिले तर या मुली उच्चवर्गीय मुलांच्यापेक्षा श्रेष्ठ ठरतील.

१२ फेब्रुवारी १८५३ रोजी या शाळेतील २५३ मुलींची जाहिर वार्षिक परिक्षा पूना कॉलेजच्या आवारात पार पडली. ही परिक्षा पाहण्यासाठी पुण्यातील नामांकित व्यक्ती हजर होत्या. याचबरोबर जवळपास ३००० लोक कॉलेजच्या आवारात आणि तितकेच लोक कॉलेजच्या आवाराबाहेर हजर होते. शाळेतील मुलींची प्रगती पाहून उपस्थितांनी समाधान व्यक्त केले. याप्रसंगी शाळेतील एका मुलीला बक्षीस म्हणून काय पाहिजे? असे विचारले असता तिने खाउ खेळण्याऐवजी शाळेसाठी ग्रंथालयाची मागणी केली. यावरून त्याकाळात दिले जाणारे शिक्षण किती उच्च प्रतीचे होते, हे लक्षात येते.

फुले दांपत्याला करावयाचे शिक्षण प्रसाराचे कार्य केवळ साक्षर करण्यापुरते मर्यादित नव्हते तर आयुष्याला नवा अर्थ देणारे, स्त्री शुद्रातिशुद्रांना त्यांच्या अस्तित्वाची जाणीव करून देणारे कार्य होते. परंपरेने ज्यांना कधी तोंड उघडू दिले नाही त्यांना बोलते करणारे होते. शाळेत दिल्या जाणाऱ्या शिक्षणाच्या गुणवत्तेकडे सावित्रीबाईंचे लक्ष होते. शाळेतील मुलेमुली हे गुणसंपन्न, चारित्र्यसंपन्न व्हावेत. विद्यार्थ्यांची विचारशक्ती, स्मरणशक्ती वाढली पाहिजे, सामाजिक जाणीवा निर्माण झाल्यास पाहिजेत, अन्यायाविरूध्द झगडण्याची शक्ती त्यांच्यात आली पाहिजे, यासाठी त्यांचा आग्रह असे.

त्यांच्या शाळेत शिकलेल्या ११ वर्षाच्या मुक्ता नावाच्या मातंग समाजातील मुलीचा निबंध त्या काळात १८५५ साली प्रसिध्द झालेल्या ज्ञानोदय मासिकात दोन भागात प्रसिध्द करण्यात आला होता. तसेच त्याकाळी ना वि जोशी, यांनी १८६८ साली लिहिलेल्या पुणे शहराचे वर्णन या पुस्तकात देखील या निबंधाची नोंद घेण्यात आली होती.

या निबंधात मुक्ता म्हणते, ''हे लाडूखाउ ब्राम्हण लोक तर म्हणतात की, वेद ही आमचीच भत्ता आहे. इतरेजनांस वेद पाहण्याचा अधिकार नाही. जर आम्हास आमची धर्मपुस्तक पाहण्याची मोकळी नाही, हे भगवाना तुजकडून आलेला कोणता धर्म आम्ही स्वीकारताना तो लवकर कळीव म्हणजे तेणप्रेमाणे तजवीज करता येईल.

शाळेत शिकणाऱ्या मुलीने सरळसरळ धर्मसंस्थेला प्रश्न विचारण्याचे धाडस दाखविले, यावरून शिक्षणाच्या गुणवत्तेची कल्पना येते.

**थोर शिक्षणतज्ञ :**

ज्ञान हीच खरी शक्ती, ताकद असून ज्ञानामुळेच व्यक्तीची प्रगती होवू शकते. ही गोष्ट १५० वर्षापूर्वी ओळखली होती. आजही डॉ. रघुनाथ माशेलकर, डॉ ए पी जे अब्दुल कलमांनी हेच सांगितले आहे.

शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे साधन असून केवळ साक्षर करण्यासाठी त्यांना शिक्षण दयायचे नव्हते तर शिक्षणातून समाजजागृती व्हावी, जुनाट रूढी, परंपरा, अंधश्रध्दा, भोडया समजुती नष्ट व्हाव्यात अशी सावित्रीबाईंची अपेक्षा होती. त्यामुळे काव्यफुले या काव्यसंग्रहात त्या म्हणतात, –

**''शुद्रांना सांगण्याजोगा शिक्षण मार्ग हा।**

**शिक्षणाने येते मनुष्यत्व, पशुत्व हटते पाहा।**

मनुष्यत्वासाठी शिक्षण हा मूलभूत विचार दिडशे दोनशे वर्षापूर्वी सावित्रीबाईंनी मांडला. एका अर्थाने त्या थोर शिक्षणतज्ञच होत्या. लोकांना माणूस बनविणे, ताठ मानेने उभे रहायला शिकविणे, स्वत्व जपण्यास शिकविणे, त्याच्यापुढे जावून माणसांबद्दल प्रेम निर्माण करण्यास शिकविणे, एवढा शिक्षणविषयक व्यापक दृष्टिकोन सावित्रीबाईचा होता.

ज्या काळात शिक्षण घेणे पाप समजले जाई, त्या काळात सावित्रीबाई म्हणत, ''आपल्या पुत्रास शिकविणे हे मातापित्याचे कर्तव्य आहे, जे मातापिता आपल्या पुत्रास / कन्येस शिकवीत नाहीत ते त्यांचे शत्रू समजावेत. आईबापांनी मुलांना विदया शिकवावी.

२००९ साली अस्तित्वात आलेल्या आरटीई नुसार ६ ते १४ वयोगटातील मुलामुलींना शाळेत पाठविण्याची जबाबदारी पालकांवर टाकण्यात आली आहे.

१८५३ साली ज्या परिस्थितीतून मुले येतात त्याचा बरावाईट परिणाम मुलांच्या शिक्षणावर होतो हा स्वानुभवावर आधारित सिद्ध्दांत सावित्रीबाईंनी मांडला.

सावित्रीबाई आणि फातिमा या स्वत: मागासलेल्या वस्तीतील शाळेत अध्यापनाचे कार्य करीत आणि उच्चभ्रू समाजातील शाळेवर त्याच समाजातील शिक्षकांची नेमणूक करीत, तसे पाहता, या दोघाही अध्यापनाच्या बाबतीत कुठेही कमी नव्हत्या. तरी देखील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या गुणवत्तेत फरक दिसून येत होता.

आधुनिक मानसशास्त्रात अनुवंश आणि परिस्थिती याचा विद्यार्थ्यांच्या विकासावर होणारा परिणाम स्पष्ट केलेला आहे.

शाळेत दिले जाणारे शिक्षण हे आनंददायक पद्धतीने हसत खेळत पद्धतीने देण्यावर त्यांचा कटाक्ष असे. त्यासाठी त्या स्वत: बालकविता तयार करीत. त्याचा उपयोग अध्यापनात करीत शिवाय खाउ, खेळणी, हुशारीबद्दल पारितोषिके, अशा प्रलोभनांचा वापर करीत.

पालकांनी मुलामुलींना शाळेत पाठवावे, शिकवावे याबाबत पालकांची जनजागृती करण्यासाठी त्या स्वत: पालकांच्या गाठीभेटी घेत आणि मुलामुलींना शाळेत पाठविण्यासाठी त्यांचे मन वळवीत असत.

ज्याठिकाणी पगार जास्त मिळतो, अशा ठिकाणी नोकरी करण्यास प्रशिक्षित शिक्षक अधिक पसंती देतात. हे सुध्दा निरीक्षण त्यांनी नोंदविले होते.
शिक्षणसंस्थांचा खर्च भागविण्यासाठी त्या स्वत: विनावेतन काम करीत असत तर म. फुले स्कॉटिश शाळेत अर्धवेळ वेतनावर काम करीत.

**संदर्भ :**

१. ॲड. राम कांडगे, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, (जाने २०१०), राजश्री प्रकाशन, चाकण, (पुणे)

२. डॉ. मा. गो. माळी, संपा., सावित्रीबाई फुले समग्र वाड्मय, ऑगस्ट १९८८, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

३. फुलवंताबाई झोडगे, क्रांतिदेवता साध्वी सावित्रीबाई फुले, (१९६६), पुणे.

४. हरि, नरके, संपा., 'आम्ही पाहिलेले फुले'' (१९९३), मुंबई

५. प्राचार्य डॉ मा गो माळी, श्रीमती नीला उपाध्ये, डॉ फडफुले, डॉ सावरकर, संपा., सावित्रीबाई फुले काल आणि कर्तृत्व, (मार्च १९९८), महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.